जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय. दिनांक:- ८/ ८/१९९०.

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग.]
जिल्हा परिषद, पुणे ११

विषय:- सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात नवीन
खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. व्हीएलएस १०९० / प्राशि ३ / ५२८९
दिनांक.. ११ जुलै ९० चे पत्र.

उपरोक्त विषया संबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९० पासून इयत्ता १ ली ते सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात प्रत्येक्ष सुरु असलेल्या वर्गासह [illegible] प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान तत्वार "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनांव | शाळेचे नावं व ठिकाण | इयत्ता. | माध्यम. |
| --- | --- | --- | --- |
| रामराज्य शिक्षण संस्था, पुणे | [illegible]बेवाडी | १ ली ते १९९०-९१ या शैक्ष. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह. | मराठी |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांचे सोय केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

[ पान २ वर]

Scanned by CamScanner

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परीणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबधीत संस्था, संस्था नोंदणी अधीनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबधीत संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबत या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.]
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

शेरा/-

प्रत:

प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ पुणे

जिल्हा ------------यांना माहिती व पुढील कार्यवाही साठी.

प्रत:- मा. सचिव रामराज्य शिक्षण संस्था, पुणे.

यांना माहितीसाठी अग्रेषित.

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक - मनपा/शिक्षण/[illegible]/
तुकडी/मान्यता-
पुणे, दिनांक - २८/८/९२

मुख्याध्यापक/शाळाप्रमुख,

रामराज्य शिक्षण संस्था
प्री १४५१० इंदिरानगर लोअर इंदिरा बिबवेवाडी मार्केट-
पुणे ३७.

विषय - मान्य खाजगी अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या/वर्ग उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - १) आपले जा.क्र. ९१/२/दि.१५८/९१

२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे जा.क्र. प्रा/प्राशि/आ.तु.पी.आर./९१, दिनांक - १३/८/९२

उपरोक्त विषयाबाबत तुमचे संदर्भांकित क्र. १ चे पत्रानुसार तुमचे शाळेस माहे ..जून........सन ..१९९१...पासून इयत्ता.१ली, दुसरी ची एक तुकडी-स, नैसर्गिक वाढीच्या वर्गास सुरु करणेस खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१) शासकीय नियमानुसार एस.एस.सी. / डी.एड. प्रशिक्षित शिक्षक/शिक्षिका नेमणुकासंबंधीचा प्रस्ताव मंजूरीसाठी या कार्यालयाकडे पाठवावा.

२) सदर सेवकाचे वय शासन नियमानुसार बिगरमागास - २८ वर्षे व मागासवर्गीयां-करिता ३३ वर्षापर्यंत असावे.

३) सदर तुकडीकरिता शिक्षक नेमताना शासन नियमानुसार मागासवर्गीयांचे प्रमाण पूर्ण करणे आवश्यक आहे.

४) सदर वर्गात नियमाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या इ. १ ली ते ४ थी साठी ५० व इ.५ वी ते ७ वी साठी ३० असावी.

५) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

६) जादा तुकड्या/वर्गासाठी चालू अंदाजपत्रकात तरतूद नसल्यामुळे पुढील वर्षाचे-अंदाजपत्रकीय तरतूद पाहूनच अनुदान देणेबाबत विचार करण्यात येईल.

७) तुकड्यांना/वर्गांना जून, १९९१ पासून मान्यता देण्यात आली तरीही वार्षिक तरतुदी-अभावी जून, १९९२ पासून अनुदान देणेचा विचार करण्यात येईल.

कळावे, दिनांक - २८/८/९२

शिक्षणप्रमुख
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/खाप्राशा/तु.मा. ५१३३
दिनांक - ३।३।९४

शाळा प्रमुख,

रामराज्य शिक्षण संस्था प्रा. शाळा
बिबवेवाडी पुणे ३७ .......... यांस -

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जावक क्रमांक - प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ ९३
दिनांक - २७।७।९४

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या .. इयत्तांच्या जादा तुकडीस/ नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९३ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/ नैसर्गिक वाढ. | शेरा |
|---|---|---|---|
| रामराज्य शिक्षण संस्था प्राथ. शाळा बिबवेवाडी पुणे ३७. | २ री | दुसरी तुकडी | मंजूर. |
| | ३ री<br>४ थी<br>५ वी | | नामंजूर.<br>विनाअनुदानित |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - २८।५।९४

शिक्षण प्रमुख
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/आप्राशि/तु.मा., 3959
दिनांक - १८।१२।९८

शाळा प्रमुख,

..रामराज्य शिक्षण संस्था........
..बिबवेवाडी, इंदिरानगर, पुणे ३७.. यांस -

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकडया उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र
जा.क्र. - प्रा/प्राशि/जा.तु./सी.आर./
दिनांक -

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकडयांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या ३री इयत्तांच्या ~~जादा तुकडीस~~/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९४ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/ नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| रामराज्य शिक्षण संस्था बिबवेवाडी पुणे ३७. | ३री दुसरी तुकडी. | नैसर्गिक वाढ. | मंजूर विनाअनुदानित. |

(१) वरील जादा तुकडयांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.

(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड्.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - १८।१२।९८

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/सप्रशा/पु.मा./१६४१
दिनांक - ६।८।९८

शाळा प्रमुख,
रामराज्य शिक्षण संस्थेची प्राथ. शाळा
इंदिरानगर, बिबवेवाडी पुणे ३७ यांस -

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जावक क्रमांक - प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ दिनांक - २६।४।९८

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या इयत्तांच्या जादा तुकडीस, नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९३ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/नैसर्गिक वाढ. | शेरा |
|---|---|---|---|
| रामराज्य शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा. इंदिरानगर, बिबवेवाडी पुणे ३७. | ४ थी | नै. वाढ मंजूर | विना अनुदानित. |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादितील व प्रशिक्षित (डी. एड.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - ५।८।९८

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै.माळवदकर शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/खाप्राशा/तु.मा./ 73
दिनांक - 7/8/80

शाळा प्रमुख,
रामराज्य शिक्षण संस्थेची प्राथ. शाळा
बी 12/10, इंदिरानगर, लोअर बिबवेवाडी
पुणे- 411037 यांस -

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र. - प्रा/प्राशि/जा.तु./वी.आर./ — दि. 31/3/80

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या इयत्तांच्या ~~जादा तुकडीस~~/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९६-९० पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | ~~जादा तुकडी~~/ नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| रामराज्य शिक्षण संस्था | 5 वी | ची 1 ली तुकडी | मान्य<br>कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय शिक्षक नेमू नये. |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
~~(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड्.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.~~

कळावे, दिनांक - 3/8/80.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
कै.भाऊ साहेब शिरोळे भवन,
शिवाजीनगर, पुणे ५
जा.क्र /खाप्राशा ६५४५
दि. ३१।३।०९

# आदेश

विषय -समायोजनाने तुकडी मान्यता
संदर्भ - शासन निर्णय व्हीएलएस /१००/(२३३/०६)प्राशि -३ दि. ६.१२.२००७

सन २००८- ०९ या शैक्षणिक वर्षात करण्यात आलेल्या पटपडताळणीमध्ये स्वातंत्य **बालजीवन विवकास प्रा.शाळा भवानी पेठ** या शाळेतील **इ. ५वीचीरुरी तुकडी** कमी झाली आहे.

सदर कमी झालेली तुकडी संस्थेच्या निकषानुसार **रामराज्य प्राथ.शाळा** या शाळेस संदर्भ क्र १ वरील तरतुदीनुसार पुढील अटींच्या अधीन राहून **इ. ५वीचीरुरी तुकडी** समायोजनाने मंजुर करण्यात येत आहे.

अ. सदरहू तुकडी १००% अनुदानावर मंजुर करण्यात येत आहे.

ब. सदर तुकडीचे समायोजन तुमचे शाळेत करण्यात येत आहे.

अ अन्वये आपल्या शाळेत केवळ **इ. ५वीचीरुरी तुकडी** ला१००% अनुदान देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

तसेच सदरबाबत सुधारीत सेवकसंच मंजुरी प्रस्ताव आणून तो मंजुर करुन घ्यावा.

शिक्षणप्रमुख
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

प्रत :- माहिती व कार्यवाहीसाठी
१. अधिक्षक, वेतनपथक, जि.प. (प्राथ) पुणे
२. मुख्याध्यापक
बालजीवन विकास प्रा.शाळा भवानी पेठ

Scanned by CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५.
जावक क्रमांक = मनपा/शिक्षण/बाप्राशा/शा.मान्यता/
पुणे, दिनांक- ६ जून, १९९४. 965 / 96

शाळा प्रमुख,
रामराज्य शिक्षण संस्था प्राथ. शाळा. (मराठी)
बिबवेवाडी, इंदिरानगर, पुणे 37. यांस -

विषय :- शाळा मान्यतेबाबत

संदर्भ :- मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. 822
दिनांक - 24/3/94

संदर्भांकित ठरावान्वये कळविण्यात येते की, तुमचे शाळेस शासनाने परवानगी पत्रात दिलेल्या अटी व मुंबई प्राथमिक शिक्षण १९४९ मधील नियमांतील अटींची पूर्तता करणेचे अटीवर सन १९९४-९५ पासून कायमस्वरुपी मान्यता देण्यात येत आहे.

कळावे, दिनांक -२६/६/९४.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

जा. क्र. शिक्षण/प्राथ/वे. प/९३-९८/ २५९
यशवंत[illegible]
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
यांचे कार्यालय जिल्हा परिषद पुणे
दिनांक २९-७-९८

प्रति,

मुख्याध्यापक,
रामराज्य शिक्षण संस्था,
पुणे - ३८.

विषय :- १००% अनुदान मिळणे बाबत व त्या प्रमाणे शिक्षकांचे पगार सुरु करणे बाबत.

संदर्भ :- आपले कडील पत्र जा.क्र. ८३५, दि. २८/७/९८

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, ज्या आदेशान्वये शाळा १००% अनुदानित झालेली आहे, त्या आदेशाची प्रत तसेच वेतनविषयक सर्व कागदपत्रांसह अधिक्षक, वेतन पथक, (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे या कार्यालयाशी समक्ष त्वरित संपर्क साधावा.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणें करिता

Scanned by CamScanner

२८८१४१६

आ.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा-तुमा/पुवि/०९-१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : 27 NOV 2009

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे/ अहमदनगर/ सोलापूर
शिक्षण प्रमुख/ प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे
जि. पुणे.

विषय : मान्यताप्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरीबाबत

संदर्भ : मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्राशान्या- १६०५/(३४८/०२) प्राशि-३, दिनांक ८ जुलै २००५

उपरोक्त विषयाबाबत सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावांची पडताळणी केली असता, खाली नमूद केलेल्या शाळेस संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधिन राहून नैसर्गिक वाढीच्यां प्रथम वर्गास विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १] | रामराज्य शिक्षण संस्थेची प्राथ शाळा राजीव गांधी नगर, बिबवेवाडी, पुणे-३७. | मराठी | म.न.पा | ६ वी प्रथम<br>७ वी प्रथम. | जून-२००६<br>जून-२००७ |

१. नैसर्गिक वाढीचे वर्ग शासन निर्णय दिनांक २.१२.१९३६ मध्ये नमूद केलेल्यां अटींची पूर्तता करण्यांत यावी.
२. सदर शाळांतील प्रथम वर्गास मंजूरी देण्यांत आलेली आहे. त्या वर्गास शासन निर्णय क्रमांक व्होएलएस-१००० (२४५५)/ प्राशि-१. दिनांक ८.११.२००० मध्ये नमूद केलेले सूत्र लागू होईल.

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

स्थळप्रतीवर शि. उ. स. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव सादर
१. संबंधित शाळा
२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

Scanned by CamScanner

जावक क्र. २५१
२३/१२/०९

शिक्षण मंडळ, पुणे महागरपालिका
कै.भाऊ साहेब शिरोळे भवा,
शिवाजीगर, पुणे ५
जा.क्र./खाप्राशा ५०७१
पुणे दिांक २१/१२/०९

मुख्याध्यापक,
रामराज्य शिक्षण संस्थेची,
प्राथ.शाळा, राजीवगांधीगर
बिबवेवाडी पुणे ३७

विषय :— मान्यताप्राप्त विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील नैसर्गिक वर्ग वाढीचे मंजूरीबाबत.

संदर्भ :— मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/२८८१४/१६ दि. २७.११.०९ चे पत्र

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये तुमचे शाळेस खाली दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीचे प्रथम तुकडयांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मंजूरीचे वर्षापासून विनाअनुदान तत्वावर खाली नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | इयत्ता | नैसर्गिक वाढ | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ६वी | प्रथम | जून २००६ |
| | | ७वी | प्रथम | जून २००७ |

**अटी व शर्ती :—**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेचे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा—या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरित परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करु नये.

शिक्षणप्रमुख
शिक्षण मंडळ पुणे महागरपालिका

Scanned by CamScanner

आ.क्र. ४०
२०/७/८७

जा.क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.तु/पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक:- ५/७/८७

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
----------------------

३] शिक्षण प्रमुख
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय:- मान्यताप्राप्त अनुदानित/~~विनाअनुदानित~~/~~कायम विना अनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/ वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत.

---

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव वि... विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९६ पासून अनुदान/~~विनाअनुदान~~/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | अभ्यास शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा विखेवाडी, पुणे. | मराठी | इ. ५ वीची | १ ली तुकडी | मंजूर |

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका.
अभ्यास शिक्षण संस्थेची
प्राथमिक शाळा विखेवाडी
पुणे.

Scanned by CamScanner

कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५
शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक - शिक्षण, प्रशासन, ९४०/३७१५
पुणे, दिनांक - २८-५-९३.

शाळाप्रमुख,
रामराज्य शिक्षण संस्था,
इंदिरानगर, गोखले, शिवाजीवाडी यांस -
पुणे ३५.

विषय - शाळा मान्यतेबाबत

संदर्भ - १) मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र. प्रा/,प्राशि/मान्यता/पी.आर. दिनांक - ८/८/९०
२) मा. शिक्षण मंडळ ठ.क्र. २९१ दि. २०-२-९३

संदर्भांकित ठरावान्वये कळविण्यात येते की, तुमचे शाळेस संदर्भ क्र. १ अ... शासनाने पत्रात दिलेल्या अटी व मुंबई प्राथमिक शिक्षण १९४९ मधील नियमांतील अटींची पूर्तता जून, १९९३ पर्यन्त करणेचे अटीवर सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षा-अखेर मान्यता देण्यात येत आहे.

तसेच शाळेतील जूनमधील विद्यार्थी संख्या व हजेरी, तसेच शिक्षकांची माहिती व त्रुटींची पूर्तता केल्याबाबतचा अहवाल जून, ९३ अखेरपर्यंत या कार्यालयाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

कळावे, दिनांक - १० -५-९३.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा-अनुदान/पो आर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :-

31 MAR 1995

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक ]
जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर/रायगड.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका /नगरपालिका शिक्षण मंडळ,
पुणे / सोलापूर / करमाळा.

विषय :- सन १९९४-९५ मध्ये विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] अनुदान मंजूर करणे बाबत.

संदर्भ :- १] शासन शिक्षण व सेवायोजन विभागाकडील क्र. व्हीएलएस-७०८८/[८७७९]प्राशि-१, दिनांक २८. ४. ८९.

२] संचालनालयकडील जा. क्र. खाप्राशा-१०९४/योयो/निबाभ १९-ड[११] दिनांक २९. ३. ९५ चे ज्ञापन.

ज्या खाजगी शिक्षण संस्थाना १९७३-७४ नंतर विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळा [इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. व त्या शाळा शासनाने प्रत्यक्ष परवानगी दिल्यानंतर तीन वर्षाची अट पूर्ण करीत आहेत अशा सोबतचे यादीमधील शाळांना खालील अटींची पूर्ततेच्या अधिन राहून शासन शिक्षण व सेवायोजन विभागाकडील क्र. व्हीएलएस-७०८८/[८७७९]/प्राशि-१, दिनांक २८-४-८९ अन्वये शासनाने विहित केलेल्या अटीनुसार १९९४-९५ पासून २५ %. अनुदान तत्वावर आणण्यास परवानगी देण्यात येत आहे. यापुढे या शाळा टप्प्या टप्प्याने अनुदानावर येण्यास पात्र राहतील.

अटी :- १] शासन शिक्षण विभागाकडील निर्णय दिनांक ८. २. ७४ मधील अनुदान देण्याच्या नियमांची पूर्तता झाली पाहिजे.

२] संबंधित शाळेने/संस्थेने शासनाविरुध्द न्यायालयामध्ये अनुदानाबाबत दावा / याचिका दाखल केलेली ~~नक्के~~. नसावी.

३] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या अथवा कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी नसाव्यात.

४] शाळेतील मंजूर वर्गाकडून नियमानुसार सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहीजे.

५] सदर शाळेने शासनाकडून वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

६] सदर शाळेमध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी मान्य केलेली शैक्षणिक अर्हता असलेले प्रशिक्षित शिक्षक नेमणे आवश्यक आहे. शिक्षक / शिक्षकेतर ~~कम~~ कर्मचाऱ्यांची भरती करतांना यापुढे रोस्टर पाळणे आवश्यक आहे.

विहित वयोमर्यादेचे व विहित शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक न नेमल्यास शाळेस मंजूर केलेले अनुदान रद्द होईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्ष प्रतिवर मा. शिक्षण उपसंचालक, पु. वि. यांची स्वाक्षरी आहे.

[signature]
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :१] मुख्याध्यापक, रामराज्य प्राथमिक शाळा, हरिनगर, बिबवेवाडी पुणे-३७
२] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner